**दिनांक २६/०९/२०२०**

## <u>प्रसिध्दी पत्रक</u>

**१)आरोपी लोकसेवक राजेंद्र आनंदराव बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, २) आरोपी लोकसेवक बाबासाहेब किसनराव दिलवाले, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक दोन्ही नेमुणक पोलीस ठाणे बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण यांनी ४,७५,०००/- रु लाचेची मागणी केल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १)आरोपी लोकसेवक राजेंद्र आनंदराव बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, ने. पोलीस ठाणे बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण<br>२)आरोपी लोकसेवक बाबासाहेब किसनराव दिलवाले, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, ने. पोलीस ठाणे बिडकीन औरंगाबाद ग्रामीण |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| लाच मागणी रक्कम | :- | ४,७५,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | पोलीस स्टेशन बिडकीन ठाण्याच्या हद्दीतील ३७९ च्या गुन्हयामध्ये जमा असलेली वाळु तसेच चित्तेगांव येथील तहसीलदार यांनी जप्त केलेली वाळु लीलावा प्रमाणे पोलीस स्टेशन बिडकीन चे हद्दीतुन वाहतुक करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी |
| लाच मागणी ठिकाण | :- | पोलीस ठाणे बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद ग्रामीण येथे |
| सापळा अधिकारी | :- | श्री. एस.एस.ताठे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |
| तपासी अधिकारी | | श्री. मारुती पंडित, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** तक्रारदार हे वाळु वाहतुकदार आहेत. पोलीस स्टेशन बिडकीन ठाण्याच्या हद्दीतील ३७९ च्या गुन्हयामध्ये जमा असलेली वाळु तसेच चित्तेगांव येथील तहसीलदार यांनी जप्त केलेली वाळु लीलावा प्रमाणे पोलीस स्टेशन बिडकीन चे हद्दीतुन वाहतुक करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे पोलीस स्टेशन बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण येथील १) बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, २) दिलवाले, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक हे ४,७५,०००/- रु लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना येथील पथकाने तक्रारीची शहानिशा केली असता, त्यात १)आरोपी लोकसेवक श्री राजेंद्र आनंदराव बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, २) आरोपी लोकसेवक बाबासाहेब किसनराव दिलवाले, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे बिडकीन, औरंगाबाद ग्रामीन यांनी पोलीस स्टेशन बिडकीन ठाण्याच्या हद्दीतील ३७९ च्या गुन्हयामध्ये जमा असलेली वाळु तसेच चित्तेगांव येथील तहसीलदार यांनी जप्त केलेली वाळु लीलावा प्रमाणे पोलीस स्टेशन बिडकीन चे हद्दीतुन वाहतुक करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ४,७५,,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुद्ध आज दि.२६/०९/२०२० रोजी पोलीस ठाणे बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु असून, पुढील तपास श्री. मारुती पंडीत, पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि.,औरंगाबाद हे करीत आहे.

सदर कारवाई, प्रभारी पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, ला.प्र.वि., औरंगाबाद, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री एस.एस.ताठे, ला.प्र.वि. जालना युनिट यांनी केली आहे. त्यांना पोलीस उप अधिक्षक श्री. रवींद्र निकाळजे, व स्टाफ ला.प्र.वि. जालना यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.